# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**अमरावती येथील इर्विन जिल्हा रुग्णालयातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत**

**(१) ४२९५ (२३-१२-२०१४). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा सामान्य रुग्णालय इर्विन अमरावती येथील रिक्त पदामुळे तसेच अनुकंपा पदभरती तसेच कर्मचाऱ्यांच्या कालबध्द पध्दतीने चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांवर कामाचा जास्त ताण पडत असल्याने इर्विन रुग्णालय अडचणीत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील रुग्णालयात अतिरिक्त कामांचा ताण कमी करण्याकरीता रिक्त असलेली पदे तातडीने भरण्याबाबत शासन कार्यवाही करणार आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (३०-०६-२०१५) :**(१) होय.

(२) व (३) अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयाकरीता वर्ग-१ ते वर्ग-४ ची ५८० पदे मंजूर असून त्यापैकी ४४१ पदे भरलेली असून १३९ पदे रिक्त आहेत.

वर्ग-१ ची १६ रिक्त पदे, वर्ग-२ ची ८ रिक्त पदे, वर्ग-३ ची ५२ रिक्त पदे व वर्ग-४ ६३ रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**राज्यातील वाढत्या कुपोषणाला आळा घालण्याकरीता राज्य शासनातर्फे राजमाता जिजाऊ कुपोषणमुक्ती अभियान राबविण्यात येत असल्याबाबत**

**(२) ४२९६ (२२-१२-२०१४). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वाढत्या कुपोषणाला आळा घालण्याकरिता राज्य शासनातर्फे राजमाता जिजाऊ कुपोषणमुक्ती अभियांन राबविण्यात आली असून कुपोषित प्रति बालकांना १००० रुपये देण्यात येत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्यावतीने देण्यात येत असलेल्या १००० रुपयांपैकी २४० रुपये औषधांकरीता तर आहाराकरिता ७६० रुपयें खर्च करावे लागत असल्याने एवढ्या तुटपुंज्या रुपयात कुपोषण मुक्ती होणार आहे काय,
(३) असल्यास, आजपर्यंत या योजनेपासून किती बालके कुपोषण मुक्त झाली आहेत,
(४) तसेच देत असलेल्या तुटपुंज्या अनुदानात शासन वाढ करुन कुपोषणाच्या मुक्तीसाठी शासन ठोस कृतीशील कार्यक्रम राबविणार आहे काय,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२४-०६-२०१५) :**(१) व (२) हे अशंतः खरे आहे.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत ग्रामीण, आदिवासी व नागरी प्रकल्पातील अंगणवाडी केंद्रातील बालकांमधील कुपोषण प्रमाण कमी करण्यासयाठी राजमात जिजाऊ माता बाल आरोग्य व पोषण मिशन ची स्थापना करण्यात आली असून मिशनमार्फत कुपोषित बालकांना रु.१०००/- इतके अनुदान देण्यात येत असून दि.१७ सप्टेंबर, २०१० च्या निर्णयानुसार ग्राम विकास केंद्रामध्ये दाखल होणाऱ्या बालकांना प्रति बांलकास ३० दिवसांसाठी रु. १००/- इतके अनुदान देण्यात येत होते. तथापि, सन २०१४-१५ च्या प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यानुसार वाढीव रु.२००/- प्रति बालकास प्रति महिना अनुदानाची तरतूद करण्यात आली आह त्यानुसार प्रत्येक बालकास ३ वेळचा आहार रु.२०/- प्रमाणे २४०/- तसेच अंगणवाडी सेविकास व मदतनीस यांना मानधन, मजूरी व इंधन यासाठी प्रतिदिन रु. १२/- प्रमाणे ३६०/- असे एकूण रु. १२००/- देण्यात येतात.
(३) सन २०१४-१५ मधील माहे जानेवारी, २०१५ अखेरपर्यंत ग्राम बाल विकास केंद्रामध्ये एकूण ५७०६३ बालकांना दाखल करण्यात आले असून त्यापैकी ४८१५२ बालकांच्या वजनामध्ये वाढ झालेली आहे.
(४) केंद्र शासनाने मंजूद केलेली एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुर्नरंचना या योजनेची राज्यातील वर्धा, नंदुरबार, बुलढाणा, नांदेड, गडचिरोली, चंद्रपूर, जळगांव,वाशिम अहमदनगर, परभणी, धुळे, बीड, अमरावती, जालना, नागपूर, सांगली, मुंबई, हिंगोली, नाशिक व गोंदिया या २० जिल्ह्यात अंमलबजावणी करण्यास दि. ३०/०४/२०१४ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

सदर शासन निर्णयाप्रमाणे वरील २० जिल्ह्यातील पुरक पोषण आहाराचा दर पूर्वीच्या रु.४/- ऐवजी रु.६/- केलेला आहे. पोषण आहारात केंद्र व राजाच्या हिस्सा ५०:५० या प्रमाणात असून दि२६/०९/२०११ च्या शासन निर्णयान्वये राज्याच्या हिश्यामध्ये दि.०१/१०/२०११ पासून रु. १ /- ने वाढ केलेली असल्यामुळे राज्याचा हिस्सा रु. ३/- प्रमाणे देण्यात पूर्वीपासून देण्यात येत आहे. आता केंद्र शासनाकडून देखील रु.३/- प्रमाणे देण्यात येणार आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गोंदिया नगर परिषदद्वारे केंद्र सरकार पुरस्कृत UIDSSMIT योजने अंतर्गत भूमिगत गटार योजनेचे काम सुरू न होणे

**(३) ४३४४ (२३-१२-२०१४). श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया नगर परिषद येथे केंद्र सरकार पुरस्कृत युआरडीएसएसएमटी योजने अंतर्गत मंजूर १२६ कोटी रूपये भूमीगत गटार योजनेची कामे अद्यापपर्यंत सुरू केली नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरपरिषदेला राज्य सरकार व केंद्र सरकारकडून ५६ कोटी रूपये देऊन एक वर्ष पूर्ण झाले तरीही कामे अद्यापपर्यंत सुरू न करण्याची नेमकी कारणे काय आहेत,

(३) तसेच शासनाने दिलेल्या मुदतीत कामे न करणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचारी आणि पदाधिकारी यांचेवर शासन काय कार्यवाही करणार आहे,

(४) ह्याविषयी शासनाने सप्टेंबर, २०१४ मध्ये नगर परिषद गोंदियाला कारणे दाखवा नोटीस कलम ३१२ अन्वये देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(५) अद्याप, उपरोक्त प्रकरणी कोणतीच कार्यवाही झाली नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) केंद्र शासन पुरस्कृत युआयडीएसएसएमटी योजनेअंतर्गत मंजूर गोंदिया नगरपरिषदेची भुयारी गटार योजनेचे कार्यान्वयन कोणत्या यंत्रणेमार्फत व्हावे याचा नगरपारिषदेेेमार्फत योग्य तो निर्णय होऊ न शकल्याने सदरची योजना ही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्याचे निदेश महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ च्या कलम ३१२ (अ) नुसार शासनामार्फत गोदिंया नगरपरिषदेस देण्यात आलेले असून त्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याबाबत सूचना गोंदिया नगरपरिषदेस आलेल्या आहेत ?

---

## ठाणे वाहतूक पोलिसानी कळवा-खारेगांव नाका येथे गावठी दारु पकडल्याबाबत

**(४) ४६१५ (२३-१२-२०१४). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे वाहतूक पोलिसाची दि. २४ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास कळवा - खारेगांव नाका येथे सुमारे १ लाख ५६ हजार ८०० रुपयांच्या गावठी दारुच्या साठ्यासह दोन व्यक्तींना ताब्यात घेतले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले,

(४) चौकशीनुसार संबंधिताविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) सदर प्रकरणी कळवा पोलीस स्टेशन येथे गुरक्र.TTT १०/१४ मुंबई प्रोव्हीजन कायदा कलम ६५ (एफ), ६६ (१) (ब), ८१ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणी चौकशी अंती तीन व्यक्तींना अटक करण्यात आलेली असून अटक आरोपितांना मा.न्यायालयाने जामीनावर मुक्त केलेले आहे. सदरचा गुन्हा तपासाधीन आहे.

---

**मंत्रालयात कॉम्प्युटरची गरज असल्याची बतावणी करणा-या दीपक प्रभू या चार्टर्ड अकाऊटरला ठाणे पोलिसांनी अटक केल्याबाबत**

**(५) ४६१७ (१५-०१-२०१५). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंत्रालयात कॉम्प्युटर पुरविण्याची बतावणी करणा-या दीपक प्रभू या चार्टर्ड अकाऊंटटंला ठाणे पोलिसांनी दि. २४ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले,त्यानुसार संबंधिताविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे ?

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१५) :**(१) होय.

(२) व (३) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आलेली असून वर्तकनगर पोलीस स्टेशन गुरनं.३११/२०१४ भादंवि कलम ४२०, ३४ प्रमाणे दिनांक ०८.०७.२०१४ गुन्हा दाखल आहे.

सदर गुन्ह्यातील दोन आरोपितांपैकी एका आरोपीतास अटक करण्यात आली असून त्याचेविरुध्द मा.न्यायालयात दिनांक १४.०१.२०१५ रोजी चार्जहाफशिट नं.०४/२०१५ तसेच या गुन्ह्यातील दुस-या आरोपितास मिळून येतातच त्यास अटक करण्याची तजवीज ठेवली आह.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईत पोलिसांच्या वार्षिक उमंग या कार्यक्रमात आरोपी कलावंतांचे गाणे सादर करण्यात आल्याबाबत**

**(६) ५१८६ (०६-०४-२०१५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अंधेरी येथील स्पोर्टस कॉम्प्लेस येथे दिनांक १० जानेवारी, २०१५ रोजी मा.मुख्यमंत्री व पोलीस आयुक्त यांच्या उपस्थितीत झालेल्या मुंबई पोलिसांच्या वार्षिक उमंग या कार्यक्रमात बलात्काराचा आरोप असलेला गायक अंकित तिवारी याने गाणे सादरीकरण प्रकरणात मुंबई पोलिस आयुक्तांनी माफी मागितली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१५) :**(१) सदर प्रकरणी मुंबई पोलीस आयुक्तांनी माफी मागितलेली नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पलुस औद्योगिक वसाहतीमध्ये जागेची पुरेशी उपलब्धता नसल्याबाबत**

**(७) ५२१५ (०९-०४-२०१५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पलुस औद्योगिक वसाहतीमध्ये जागेची उपलब्धता नसल्यामुळे उद्योजकांना उद्योग वाढविण्यासाठी अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पलुस औद्योगिक वसाहतीचा विकास खुंटला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१५-०६-२०१५) :**(१) व (२), (३) हे खरे नाही.

सांगली जिल्ह्यातील पलुस तालुक्यात १०.०० हे आर सरकारी जागेवर पलुस (छोटे) औद्योगिक क्षेत्र विसीत करण्यात आले आहे व तेथे १८ औद्योगिक व ३ व्यापारी भूखंडांचे आरेखन करण्यात आलेले असून सर्व भूखंडांचे वाटप करण्यात आलेले आहे.

अति. पलुस (छोटे) औद्योगिक क्षेत्र हे ५३.०० हे आर इतक्या सरकारी जागेवर विकसीत करण्यात आले आहे. तेथे ६१ औद्योगिक व १ व्यापारी भूखंडाचे आरेखन करण्यात आलेले आहे. त्यापैकी ३८ भूखंडाचे वाटप करण्यात आलेले असून अद्याप २३ भूखंड वाटपासाठी उपलब्ध आहेत.

अति. पलुस (वाईन पार्क) औद्योगिक क्षेत्रामध्ये द्राक्षे वाईन पार्ककरिता ४५ एकर असलेला भूखंड राखीव ठेवण्यात आला आहे. तथापि, सदर भूखंडांस मागणी प्राप्त होत नसल्यामुळे सदर भूखंड (४५ एकर) हा अन्न प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांना वाटप करण्याचा महामंडळाने निर्णय घेतला होता.

मे.एबीइनबेव इंडिया प्रा.लि. यांनी अन्न प्रक्रिया उद्योगाकरिता सदर क्षेत्राची मागणी केल्यामुळे भूखंड वाटप समितीने त्यांना सदर भूखंडाचे वाटप केले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ग्रामीण व शहरी भागातील भूसंपादनातील तफावत दूर करण्याबाबत**

**(८) ५२६६ (०४-०४-२०१५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भूसंपादन वटहुकुमानुसार केंद्र शासनाने कायद्यात ग्रामीण भागात प्रचलित बाजारभावाच्या चारपट भरपाई देण्याची तरतूद कायम ठेवली तरी महाराष्ट्र राज्याने यासंदर्भात केलेल्या नियमावलीनुसार केवळ कमाल अडीचपट भरपाई दिली जाणार असून शहरात दुप्पट भरपाई देण्याची तरतूद तशीच्या तशीच स्वीकारल्यामुळे शिफारशीपेक्षा दीडपट कमी रक्कम प्रकल्पग्रस्तांना बसणार असल्याने त्यांचे आर्थिक नुकसान सोसावे लागणार असल्याचे माहे जानेवारी, २०१५ वा त्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त भूसंपादनातील तफावत दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-०६-२०१५) :**(१) होय,

शासनाने यापूर्वी दि. १९३२०१४ व दि. १३.८.२०१४ रोजीच्या अधिसूचने अन्वये गुणांक निश्चितीची कार्यवाही केली होती. तथापि, सदर अधिसूचनेस मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद/नागपुर खंडपीठ येथे आव्हान देण्यात आले होते. त्यावर मा.न्यायालयाने सुनावणी अंती सदर दोन्ही अधिसूचना रद्द केल्या आहेत.

(२) शासनाच्या प्रकल्पासाठी सार्वजनिक प्रयोजनासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी भूसंपादन अधिनियमातील तरतूदीनुसार संपादित करण्यात येतात. नवीन भूसंपादन कायदा, २०१३ मध्ये जमिनीचा मोबदला निश्चित करण्याची कार्यपध्दती कलम २६ ते ३० मध्ये नमूद करण्यात आलेली आहे. त्यामधील कलम २६ (२) व १ ले परिशिष्टामधील तरतूदीनुसार जमिनीच्या बाजारमूल्यास गुणावयाचा गुणांक (Multiplier Factor) शासनाने निश्चित करावयाचा आहे. त्यानुषंगाने, शासन मान्यतेने गुणांकाबाबतची सुधारित अधिसूचना महाराष्ट्र राजपत्रात दि. २६.५.२०१५ रोजी निर्गमित केलेली आहे.

सदर अधिसूचनेमधील तरतूदीचा विचार करता, ग्रामीण भागासाठी गुणांक २- असा निश्चित करण्यात आलेला असल्यामुळे, कायद्यातील १ ले परिशिष्टातील तरतूदीप्रमाणे ग्रामीण भागासाठी शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला जमिनीच्या बाजारमूल्याच्या ४ पट देय राहील व शहरी भागासाठी गुणांक- १ असा असल्यामुळे जमिनीच्या बाजारमूल्याच्या २ पट देय राहील.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शुल्क प्रतिपूर्ती त्वरीत देण्याबाबत**

**(९) ५२८६ (०९-०४-२०१५). श्री.संग्राम थोपटे (भोर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नव्याने सुरु झालेल्या अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्रनिकेतन व जुन्या महाविद्यालयामधील नवीन तुकड्या यात प्रवेश घेतलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना उच्च न्यायालयाच्या आदेशानंतरही त्यांना शुल्क प्रतिपूर्ती देण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच दिरंगाई करणा-या दोषी अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१४-०७-२०१५) :**(१) व (२) शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यात सुरु असलेल्या महाविद्यालयातील नवीन पदवी/पदव्युत्तर पदवी/ पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम सुर करण्यास, प्रवेश क्षमतेत वाढ व घट करण्यास तसेच नवीन पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थांना शासन मान्यता देण्याबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभागाने शासन निर्णय दि. ०९.०५.२०१३ व दि.१५.०५.२०१३ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे.

सदर शासन निर्णयाच्या संदर्भात मा.उच्च न्यायालयाने दिनांक ०९.०९.२०१४ व दिनांक १५.०९.२०१४ रोजी आदेश दिले आहेत. सदर आदेशाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही उच्च व तंत्र शिक्षण विभागांमार्फत सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई शहर, ठाणे व राज्यात छुप्पे लेडीज बार सुरु असल्याबाबत**

**(१०) ५३०४ (०६-०४-२०१५). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पोलिसांच्या समाजसेवा शाखेने मुंबईतील बार वरील धाडीत ७६ जणांना अटक करुन अनेक मुलींची सुटका करण्यात आल्याचे माहे जाने. २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेवरुन मुंबई शहर, ठाणे व राज्यात छुप्पे लेडीज बार सुरु असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग-१ बाबत अटक केलेल्यांवर तसेच राज्यात सुरु असलेले लेडीज बार बंद करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०७-२०१५)** :(१) होय.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) सदर गुन्ह्यातील अटक केलेल्यं आरोपींविरुध्द मा.न्यालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात येत असून आरापींवर दोषसिध्द होऊन त्यांना मा.न्यायालयाकडून कठोर शिक्षा करण्याबाबत पोलीसांकडून सर्वोत्तोपरी प्रयत्न करण्यात येत आहे. तसेच ऑर्केस्ट्रा बारच्या परवान्यातील अटी व शर्तींचे उल्लंघन करणा-या बारच्या परवान्याचे ठराविक मुदतीसाठ निलंबन करणे व ते रद्द करण्याबाबतची कार्यवाही संबंधित परवाना प्राधिका-यांकडून करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे महानगरपालिकेच्या मुख्यालयातील शहर विकास विभागातील संगणकावरील गोपनीय माहिती एका बड्या विकासकाचे दोन प्रतिनिधी हाताळत असल्याचा प्रकाराबाबत**

**(११) ५३०५ (०८-०४-२०१५). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महानगरपालिकेच्या मुख्यालयातील शहर विकास विभागातील संगणकावरील गोपनीय माहिती एका बड्या विकासकाचे दोन प्रतिनिधी हाताळत असल्याचा प्रकार दिनांक ८ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकाराची गंभीर दखल घेत महापौर यांनी चौकशीचे आदेश दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०७-२०१५)** :(१) हे खरे नाही.

तथापि, महानगरपालिकेच्या Pre DCR प्रणालीमध्ये विकासकांच्या On Line प्रस्ताव Run करताना येणाऱ्या त्रुटींची पूर्तता वास्तुविशारदाकडून करुन घेऊन विकास प्रस्ताव अद्यावत सादर करण्याची वास्तुविशारद / प्रतिनिधी व विकासक / प्रतिनिधींना शहर विकास विभागामध्ये उपअभियंता यांच्या उपस्थितीत अडचणीचे निरसन करुन प्रस्ताव अद्यावयात करण्याची पध्दत प्रचलित आहे. त्यानुसार दिनांक ०७.०१.२०१५ रोजी मे.क्लॅरिएंट केमिकल्स इंडिया लि.चे वास्तुविशारदांचे व विकासकांचे प्रतिनिधी उपस्थित होते. परिणामी शहर विकास विभाग व विकासक यांच्या संगनमताची बाब वस्तुस्थितीला धरुन नाही.

(२) व (३) महापौर, ठाणे महानगरपालिका यांनी उपरोक्त प्रकरणाबाबत चौकशीचे आदेश दिलेले असून याबाबतची चौकशीचे आदेश दिले नसून याबाबतची सविस्तर माहिती उपलब्ध करुन देण्याचे सुचित केले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण (जि.ठाणे) शिवकालीन इतिहासाची साक्ष असलेल्या कल्याणच्या काळा तलावाच्या सुशोभिकरणाचे काम रखडल्याबाबत**

**(१२) ५३०७ (०७-०४-२०१५). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) शिवकालीन इतिहासाची साक्ष असलेल्या कल्याणच्या काळा तलावाच्या सुशोभिकरणाचे काम रखडल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्नाबाबत चौकशी करण्यात आली काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार काळा तलावाच्या सुशोभिकरणाचे काम सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०१५) :**(१) नाही.

कल्याण येथील काळा तलावाच्या सुशोभिकरणाचे काम पूर्ण झाले असून दि.२७/०८/२०१० पासून हा तलाव नागरिकांसाठी खुला करण्यात आला आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धुळे जिल्हा रुग्णालयातील विविध मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य चतुर्थश्रेणी सरकारी कर्मचारी संघटनेने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर केलेली निदर्शने**

**(१३) ५३२९ (०९-०४-२०१५). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यातील वैद्यकीय शिक्षण संशोधन संचालनालयांतर्गत जिल्हा रुग्णालयातील अनुकंपा तत्वावरील भरती प्रक्रिया विनाअट राबवावी, बदली कर्मचा-यांना सेवेत कायम करावे, आऊटसोर्सिंग बंद करावे यासह विविध मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य चतुर्थश्रेणी सरकारी कर्मचारी संघटनेच्या येथील शाखेने दिनांक १५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यादरम्यान जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-०६-२०१५) :**(१) होय हे खरे आहे.

(२) यासंदर्भात संघटनेने जिल्हाधिकारी, धुळे यांना सादर केलेल्या निवेदाची प्रत जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत मा. मुख्यमंत्री कार्यालयास पाठविण्यात आली आहे. सदर निवेदनातील या विभागाशी संबंधित मुद्यांबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

अ) अनुकंपा तत्वावरील भरती प्रक्रिया प्राचलित शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या निर्देशांनुसार करण्यात येते.

ब) वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयांतर्गत कार्यरत बदली कर्मचाऱ्यांना सेवेत नियमित करण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधिन आहे.

क) स्वच्छताविषयक कामे बाहयस्त्रोताद्वारे करण्याच्या निर्णयाची अद्यापर्यंत प्रत्यक्षात अमंलबजावणी झालेली नाही.

(३) प्रश्न उदभवत नाही.

---

**ठाणे जिल्हयातील भिवंडी कृषी उत्पन्न बाजार समितीने दुगाडाफाटा येथील गोदामे कोको कोला कंपनीला भाडयाने दिल्याबाबत**

**(१४) ५३४८ (१८-०४-२०१५). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील भिवंडी कृषी उत्पन्न बाजार समितीने महाराष्ट्र राज्य सहकारी मार्केट फेडरेशनने धान्याचा साठा करण्यासाठी दुगाडाफाटा येथे प्रशस्त उभी करण्यात आलेली ५ गोदामे कोका कोला कंपनीला भाडयाने दिल्याचा प्रकार माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गोदामे कंपनीला भाड्याने देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०८-०७-२०१५) :**(१) हे अंशतः खरे आहे. कृषी उत्पन्न बाजार समिती भिवंडी यांनी पणन महासंघास राईस मिलची उभारणीकरीता जागा दिली आहे. त्याठिकाणी राईस मिलसाठी प्रथम ३ गोदामांचे बांधकाम केले आहे. त्यानंतर २ गोदामे सुखदा उत्पादनासाठी बांधली. अशी एकूण ५ गोदामे उभी केली आहेत.

सदर ५ गोदामांपैकी ३ गोदामे कोकाकोला कंपनीस भाड्याने दिली असून राईस मिलचे एक गोदाम रिक्त आहे. एका गोदामात शासनाचे वतीने परिसरातील शेतक-यांचे धान खरेदी करुन साठविण्यात येत आहे.

(२) गोदामे रिक्त ठेवणे योग्य नसल्याने व पणन महासंघाचे त्या ठिकाणचे व्यवस्थापन व देखभाल खर्च, स्थानिक पातळीवरील मालमत्ता कर, इतर अनुषंगिक खर्च भागविणे आवश्य असल्याने मार्केटिंग फेडरेशनची गोदामे भाडे तत्वावर दिली आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात रेडीरेकनर आणि स्टँम्प डयूटीच्या दरात १८ टक्क्यांनी वाढ केल्याबाबत.**

**(१५) ५३८४ (१७-०४-२०१५). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.नसीम खान (चांदिवली), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.संजय कदम (दापोली), श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रेडीरेकनरच्या दरामध्ये राज्य शासनाने सरासरी १४ टक्क्यांनी वाढ केली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठाणे, मीरा-भाईंदर, उल्हासनगर, भिवंडी-निजामपूर, वसई-विरार या महानगरपालिकांच्या क्षेत्रांमध्ये सरासरी २० टक्के दरवाढ, मुंबई महानगरपालिका क्षेत्रात १४.८० तर पुणे महानगरपालिका क्षेत्रात १४ टक्क्यांनी दरवाढ करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रेडी रेकनरचे दर अवाजवी असल्याने घरांच्या किंमतीत वाढ होणार असल्याने सर्वसामान्य नागरिकांना मुंबई किंवा शहरात घर घेणे परवडणार नाही हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, रेडी रेकनरच्या धोरणामुळे घरबांधणी, घर खरेदी-विक्री इत्यादी सर्व घटकांवर परिणाम होणार असल्याने राज्य शासनाने रेडी रेकनरचा दर कमी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, अद्याप उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१७-०६-२०१५)** :(१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) नाही, वार्षिक मूल्यदर तक्ते हे मुद्रांक शुल्क आकारणीसाठी तयार करण्यात येतात.
(४) वार्षिक मूल्यदर तक्ते अंमलात आल्यानंतर दर कमी करण्याबाबत नियमात तरतूद नसून, एखाद्या मिळकतीबाबत दर मान्य नसल्यास अभिनिर्णयांतर्गत सविस्तर मूल्यांकन करुन घेण्याबाबत महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमता तरतूद आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती विद्यापीठ रोडवरील एका अभियांत्रिकी महाविद्यालयाने सन २०१४-१५ च्या दुसऱ्या सेमिस्टरच्या प्रवेशासाठी शुल्क न भरणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश नाकरल्याबाबत**

**(१६) ५४२७ (०८-०४-२०१५). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती विद्यापीठ रोडवरील एका अभियांत्रिकी महाविद्यालयाने सन २०१४-१५ च्या शैक्षणिक वर्षाच्या दुसऱ्या सेमिस्टरच्या प्रवेशासाठी ३० हजार रूपये शुल्क भरण्यासाठी तगादा लावून त्यासाठी दिनांक ३१ डिसेंबर २०१४ ही अंतीम मुदत दिलेली होती परंतू उक्त मुदतीच्या कालावधित काही शेतकऱ्यांची मूले सदरील शुल्क भरू न शकल्याने या महाविद्यालयांनी या विद्यार्थ्यांना वर्गप्रवेश नाकारला असून विद्यापीठ परीक्षेचे अर्जही स्वीकारण्यास नकार दिल्याचे दिनांक १० जानेवारी २०१५ रोजी वा त्या सुमारास निर्देशनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-०७-२०१५) :**(१) नाही.

(२) व (३) प्रश्न नाही.

---

**जंगल असलेल्या कोळसा खाणींच्या चंद्रपूर जिल्ह्यात दरवर्षी परराज्यातील हजारो कामगारांचे लोंढे पोटाची खळणी भरण्यात येत असल्याबाबत**

**(१७) ५४३६ (०७-०४-२०१५). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेकडो उद्योगांचे जंगल असलेल्या कोळसा खाणींच्या चंद्रपूर जिल्ह्यात दरवर्षी परराज्यातील हजारो कामगारांचे लोंढे पोटाची खळणी भरण्यासाठी अनेक उद्योगात काम करण्यासाठी येत असून या परराज्यातील हजारो कामगारांची नोंद सहायक कामगार आयुक्त कार्यालय आणि संबंधित उद्योगात नसल्याची माहिती दिनांक १९ जानेवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सहायक कामगार आयुक्त कार्यालयात एकाही कामगारांची नोंद दिसत नसल्यामुळे आंतरराज्य स्थलांतरित कामगार अधिनियमातील १९७१ च्या तरतुदीचा सर्रासपणे भंग केला जात असल्याची माहिती निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदर प्रकरणाबाबत कोणकोणत्या अधिकारी आणि उद्योगावर कार्यवाही करण्यात आलेली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (२०-०६-२०१५) :**(१) हे खर आहे.

सहाय्यक कामगार आयुक्त (केंद्रीय), चंद्रपूर यांचे कार्यालयात कोळासा उद्योगातील परराज्यातील कामगारांची कोणतीही नोंद नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### चंद्रपूर जिल्ह्यातील रस्ते दर्जोन्नत करण्याबाबत तसेच रस्त्याच्या दुरुस्तीबाबत

**(१८) ५४५२ (१०-०४-२०१५). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), अॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यांतर्गत सिंदेवाही-रामाळा-गडबोरी-वासेरा रस्ता (ता.सिंदेवाही) इजिमा-१३० लांबी ८.७० किमी आणि मुरमाडी-कळमगाव गन्ना-कुकडहेठी इजिमा-४१, लांबी ६.०० किमी तसेच सावली तालुक्यातील सिर्सी-जाम बुज-केरोडा-व्याहाड, बुज-सामदा-सोनापूर-निलसनी पेठगाव-उपरी इजिमा-१३५, लांबी २२.९० किमी रस्ते असून हे तीनही रस्ते जिल्हा परिषद चंद्रपुरचे इजिमा रस्ते दर्जोन्नत करुन इतर जिल्हा मार्ग करावे याबाबतचा ठराव जिल्हा परिषद चंद्रपुर यांनी दिनांक २८ ऑगस्ट, २०१४ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेमध्ये घेण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर ठरावाच्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग जिल्हा परिषद चंद्रपुर ह्यांनी क्र.बांध/मु. आरे/२४११/२०१४ दिनांक ३० ऑगस्ट, २०१४ या पत्रानुसार तीनही इजिमा रस्ते दर्जोन्नत करुन इतर जिल्हा मार्ग करण्यात यावे असा प्रस्ताव अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग चंद्रपुर व मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर यांच्या मार्फत शासनाकडे पाठवून सदर प्रस्तावास अद्यापही मंजुरी मिळालेली नसल्यामुळे लोकप्रतिनिधींनी मा.मंत्री सार्वजनिक बांधकाम, अप्पर मुख्य सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग यांना दिनांक ५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) चंद्रपूर जिल्ह्यातील गांगलवाडी-आवळगाव-मुडझा (ता.ब्रम्हपूरी), रोजाली-पेटगाव-मोळाळी-जामसाळा (ता.सिंदेवाही), सिंदेवाही-रामाळा-गडबोरी-वासेरा हे रस्ते नादुरुस्त असल्यामुळे तेथे वांरवांर अपघात होत असल्यामुळे या तीनही रस्त्याचे मजबुतीकरणासह डांबरीकरण

करण्याबाबत मागणी करुनही अद्यापही या कामांना मंजूरी मिळालेली नसल्याची दिनांक २० जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व सदर प्रस्तावास निधीसहीत मंजूरी मिळण्यासाठी तसेच गांगलवाडी-आवळगाव-मुडझा (ता.ब्रम्हपूरी), रोजाली-पेटगाव-मोळाळी-जामसाळा (ता.सिंदेवाही), सिंदेवाही-रामाळा-गडबोरी-वासेरा या तीनही रस्त्याचे बांधकाम करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यत येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०६-२०१५) :**(१) होय. सदर ठराव दिनांक १४/०८/२०१४ रोजी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेमध्ये घेण्यात आला आहे.
(२) होय. मा.लोकप्रतिनिधींनी दिनांक ५ जानेवारी, २०१५ रोजी निवेदन दिले हे खरे आहे.
(३) व (४) सदर रस्त्याच्या दुरुस्तीची कामे प्रगतीत असून रस्ते वाहतूकी योग्य ठेवण्यात आलेले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्ह्यातील क दर्जाच्या ७८ तीर्थक्षेत्राच्या विकासाबाबत.**

**(१९) ५४७९ (०८-०४-२०१५). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यातील क दर्जा असलेल्या ब्रम्हपूरी १४, सिंदेवाही १०, चिमूर ११, नागभीड ६, गोंडपिंपरी १२, जिवती ४, भद्रावती १, चंद्रपूर ८, मूल २, वरोरा ६, राजूरा ३, कोरपना ६, पोंभुर्णा १ अशाप्रकारे १३ तालुक्यातील ७८ तीर्थक्षेत्राचा विकासासाठी फक्त १५ हजार रुपये निधी मिळत असल्यामुळे या ७८ तीर्थक्षेत्राचा विकास झालेला नसल्यामुळे यात्रेकरुंना त्यांच्या मुलभूत हक्कापासून वंचित राहावे लागत असल्याची माहिती दिनांक १० जानेवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चंद्रपूर जिल्ह्यातील क दर्जाच्या ७८ तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी राज्य शासनाने कोणती उपाययोजना केलेली आहे वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, चंद्रपूर जिल्ह्यातील क दर्जाच्या ७८ तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी राज्य शासनाच्या वतीने निधी उपलब्ध करुन देणार आहे काय वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, याबाबत होणा-या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२०-०६-२०१५) :**(१) हे खरे नाही.
सदरहू तिथक्षेत्राच्या ठिकाणी विविध विकास कामांसाठी सन २००७-०८ पासून सन २०१४-१५ पर्यंत एकूण रु.७२७.४६ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन दिला आहे.

(२) व (३) चंद्रपूर जिल्हयात एकूण ७७ क वर्गीय तीर्थक्षेत्रे असून, सदर तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भाविकांसाठी कोणकोणत्या सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्याचा आढावा घेण्यात येत आहे. सबब, सदर तीथक्षेत्राच्या ठिकाणी करण्यात येणा-या कामांची निश्चिती झाल्यावर, सदर कामांना निधी उपलब्ध करुन देण्यासाडी जिल्हा नियोजन समितीकडे व जिल्हा नियोजन समितीमार्फत शासनाच्या नियोजन विभागाकडे मागणी करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील घरकुल बांधकाम निधी अभावी अद्यापही पुर्ण झाले नसल्याबाबत**

**(२०) ५४८३ (०८-०४-२०१५). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात मंजूर करण्यात आलेल्या राज्यातील १ लाख ५२ हजार २५८ घरकुलापैकी ५८ हजार २९२ घरकुलांचे बांधकाम निधी अभावी अद्यापही पुर्ण झाले नसल्याने या सर्व लाभार्थ्यांना स्वतःच्या हक्काच्या घरकुलांपासून वंचित राहावे लागत असल्याची माहिती दिनांक १० जानेवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ज्या लाभार्थ्यांना घरकुल मंजूर झाले त्यांनी राहत असलेली झोपडी पाहून घरकुल बांधण्यासाठी जागा उपलब्ध करुन दिल्यामुळे घरकुल लाभार्थ्यांना बेघर होण्याची पाळी आलेली असल्याची माहिती निदर्शनास आली आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील मंजूर असलेल्या ५८ हजार २८२ घरकुलांचे बांधकाम करण्यासाठी आवश्यक असलेला निधी उपलब्ध करुन देण्यासाठी कोणती कार्यवाही केलेली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, याबाबत होणा-या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०७-२०१५) :**(१) नाही.

इंदिरा आवास योजनेची अंमलबजावणी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार करण्यात येते. सदरच्या सुचनेनुसार घरकुलाचे बांधकाम स्वत: लाभार्थ्यांने करणे अपेक्षित आहे. तसेच सामान्य परिस्थितीत २ वर्षात व विशिष्ट परिस्थितीत ३ वर्षात घरकुलाचे बांधकाम पूर्ण करावयाचे आहे.

तसेच लाभार्थ्यांना निधीचे वाटप घरकुल मंजूर केल्याबरोबर रु.३५,०००/- पहिला हप्ता, लिंटल लेव्हल पर्यंत बांधकाम झाल्यानंतर रु.३५,०००/- दुसरा हप्ता व शौचालयासह घरकुल पूर्ण झाल्यानंतर रु.२५,०००/- तिसरा व अंतिम हप्ता अदा करण्यात येतो.

डिसेंबर, २०१४ अखेर योजनेची आर्थिक व भौतिक प्रगती खालीलप्रमाणे-

(रूपये कोटीत)

| उद्दिष्ट | मंजूरी | पूर्ण | % | उपलब्ध निधी | खर्च | % |
|---|---|---|---|---|---|---|
| १३७३१४ | १४६९४७ | १२८१३५ | ९३ | १५०६.०२ | १३४०.९७ | ८९ |

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महावितरणतर्फे संरचना विकास योजनेंतर्गत विदर्भावर अन्याय केल्याबाबत**

**(२१) ५४८६ (०४-०४-२०१५). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरणतर्फे संरचना विकास योजनेंतर्गत २०१२-१३ ते २०१५-१६ या कालावधीसाठी ५५५६ कोटी रुपयांचा प्रकल्प खर्च आराखडा असून यापैकी पश्चिम महाराष्ट्रातील सहा जिल्ह्यांसाठी १८९८.९७ कोटी रुपये उत्तर महाराष्ट्राच्या तीन जिल्ह्यांसाठी १०७२.१४ कोटी रुपये, मुंबई - ठाण्यातील तीन जिल्ह्यांसाठी ७५२.८१ कोटी रुपये इतका वाटा निर्धारित करण्यात आले असून एकूण रकमेनुसार राज्यातील प्रत्येक जिल्ह्याला १५७ कोटी रुपयांचा वाटा मिळायला हवा होता परंतू विदर्भातील ११ जिल्ह्यांच्या हाती प्रत्यक्षात ७९.९२ कोटी रुपये इतकाच वाटा आला असल्याची संतापजनक व धक्कादायक माहिती दिनांक १० जानेवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदर्भात वीजनिर्मितीचे मोठे प्रकल्प असून राज्यातील सुमारे ५५ टक्के वीज विदर्भात निर्माण होत असतांना फक्त १४ टक्केच अनुदानाचा लाभ मिळत असल्याची माहिती निदर्शनास आली आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत विदर्भावर होत असलेला अन्याय दुर करण्यासाठी राज्य शासनाने कोणती उपाययोजना केलेली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, याबाबत होणा-या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०८-०६-२०१५) :**(१) हे अंशत: खरे आहे. पायाभूत आराखडा -२ अंतर्गत विकास कामांसाठी रु.५५५६.५० कोटीची योजना मंजूर करण्यात आली असुन पश्चिम महाराष्ट्रातील ५ जिल्ह्यासाठी रु.१६५९.९९ कोटी, उत्तर महाराष्ट्राच्या ५ जिल्ह्यासाठी रु.१२०९.८४ कोटी, विदर्भातील ११ जिल्ह्यासाठी रु.१११४.१५ कोटी व मुंबईतील ठाणे व रायगड ह्या दोन जिल्ह्यासाठी एकूण रु.४६७.८ कोटी तसेच मराठवाड्यांच्या ८ जिल्ह्यासाठी रु.१०१३.५४ कोटीच्या कामांचा समावेश आहे.

विभागपातळीवरुन प्रस्तावित केलेल्या व संबंधीत मुख्य अभियंतानी शिफारस केलेल्या कामांची तांत्रिक पडताळणी करुन प्रस्तावांना मुख्य कार्यालयातर्फे मंजूरी देण्यात आली व महाराष्ट्र विज नियामक आयोगाकडून मंजूरी घेण्यात आली आहे.
(२) नाही.
(३) पायाभूत आराखडा-२ अंतर्गत विदर्भाकरिता समाविष्ट असलेल्या रु.१११४.१५ कोटीच्या कामासोबतच विदर्भातील कृषीपंप विज जोडणीचा अनुशेष दूर करण्यासाठी रु.३५९ कोटीचा निधी महाराष्ट्र शासनाने अनुदान स्वरुपात देण्याचे मंजूर केले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अंबड (जि.नाशिक) येथील औद्योगिक वसाहतीतील कंपन्या सांडपाणी नाल्यात सोडत असल्याबाबत**

**(२२) ५५०७ (०६-०४-२०१५). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबड (जि.नाशिक) येथील औद्योगिक वसाहतीतील कंपन्यामधील सांडपाणी नाल्यात सोडत असल्यामुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास आढळून आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नाल्यात सांडपाणी सोडणाऱ्या कंपन्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (१०-०७-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पंचवटी रामकुंड ते इंद्रकुंड दरम्यान बांधण्यात आलेल्या नाशिक महानगरपालिकेच्या इमारतीमध्ये अवैध धंदे सुरु असल्याबाबत**

**(२३) ५५१८ (०६-०४-२०१५). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंचवटी रामकुंड ते इंद्रकुंड दरम्यान बांधण्यात आलेल्या नाशिक महानगरपालिकेच्या इमारतीमध्ये अनेक अवैध धंदे सुरु असून सदर ठिकाणी महानगरपालिकेचे काही जुने रेकॉर्ड, शिक्के बेवारस स्थितीत सापडले असल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती या ठिकाणी होणारे अवैध धंदे रोखण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०६-२०१५) :**(१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

पंचवटी रामकुंड ते इंद्रकुंड दरम्यान बांधण्यात आलेल्या इमारतीमध्ये, महानगरपालिकेच्या पंचवटी विभागीय कार्यालयाचे घरपट्टी, पाणीपट्टी व विविधकर विभागाचे अनावश्यक "ड" वर्ग रेकॉर्ड सन २००५ मध्ये ठेवण्यत आले हाेते. सदर रेकॉर्ड महानगरपालिकेमार्फत नियमानुसार कार्यवाही करुन, नष्ट करण्यात आले आहे. तसेच इमारतीमध्ये कोणतेही अवैध धंदे होत नाहीत.

---

**त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) येथे स्वतंत्र पंचायत सिमतीसाठी कार्यालय व समितीच्या कामकाजासाठी स्वतंत्र इमारतीसाठी जागा उपलब्ध देण्याबाबत**

**(२४) ५५२२ (०६-०४-२०१५). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर हा तालुका स्वतंत्र असल्यामुळे या तालुक्यासाठी स्वतंत्र पंचायत सिमतीसाठी कार्यालय व समितीच्या कामकाजासाठी स्वतंत्र इमारतीसाठी जागा उपलब्ध करुन इमारत बांधण्यासाठी मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी संबंधिताना वारंवार निवेदन देण्या येऊनही अद्यापी या प्रकरणी कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास आढळून आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्र्यंबकेश्वर तालुक्याकरीता पंचायत समिती कार्यालय व या कार्यालयासाठी स्वतंत्र इमारत बांधण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२४-०६-२०१५) :**(१) होय.
(२) व (३) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, नाशिक यांच्याकडून त्र्यंबकेश्वर पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारत बांधकामाकरीता मौजे पेंगलवाडी फाट्याजवळची ९० मी.X१०० मी. जागा उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडे दिनांक २६.०६.२०१४ रोजी सादर केलेला असून त्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडून सदरहू जागा उपलब्ध झाल्यानंतर त्या ठिकाणी नवीन इमारत बांधकामाचा प्रस्ताव अति. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, यांच्याकडून शासन मान्यतेसाठी सादर करण्यात येईल.

---

**राज्यात एस.टी.बस स्थानकावर प्रसाधनागृहाच्या स्वच्छतेस प्राधान्य देण्याची सूचना मा.परिवहन मंत्री यांनी एस.टी.अधिका-यांना केली असल्याबाबत**

**(२५) ५५२८ (०४-०४-२०१५). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एस.टी.बस स्थानकावर प्रसाधनागृहाच्या स्वच्छतेस प्राधान्य देण्याची सूचना मा.परिवहन मंत्री यांनी एस.टी.अधिका-यांना केली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एस.टी स्थानकावर प्रसाधनगृहांच्या स्वच्छतेस पाण्याचे नियोजन अल्प प्रमाणात असल्याने सर्व बस स्थानकांवर स्वच्छता ठेवण्याकरीता शासन मुबलक पाणी पुरवठा करणार आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासन तातडीने काय कार्यवाही वा उपाययोजना करणार आह,

(४) अद्याप, याबाबत कोणतीच कार्यवाही करण्या आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०७-०७-२०१५) :**(१) हे खरे आहे.

(२) रा.प. महामंडळाच्या बसस्थानकावरील प्रसाधनगृहे विविध संस्थांना दैनंदिन स्वच्छता व देखभालीसाठी “पैसे भरा व वापरा” या तत्वावर देण्यात आलेली आहेत. तसेच काही बसस्थानकावरील प्रसाधानगृहांची व मुतारीगृहांची दैनंदिन स्वच्छता व देखभाल रा.प. महामंडळामार्फत करण्यात येते. प्रसाधनगृहांना लागणाऱ्या पाण्याचा पुरवठा ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका इ. यंत्रणामार्फत तसेच रा.प. महामंडळाच्या विंधन विहीर, कुपनलिकेतून करण्यात येतो. प्रसाधनगृह स्वच्छतेसाठी लागणाऱ्या पाण्याचा साठा आवश्यकतेनुसार सर्व बसस्थानकावर उपलब्ध आहे.

(३) ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका इ. शासनाच्या यंत्रणेतून उपाययोजना करण्यात आलेली आहे. तसेच उन्हाळ्यात पाण्याची कमतरता भासल्यास टँकद्वारे तसेच इतर यंत्रणेमार्फत पाण्याची व्यवस्था करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक शहर स्वच्छ ठेवणाऱ्या सफाई कामगारांना कोणत्याही आरोग्य सेवा मिळत नसल्याने त्यांचे आरोग्य धोक्यात येऊन सफाई कामगारांचा मोठ्या प्रमाणात मृत्यू होत असल्याबाबत**

**(२६) ५५३० (०६-०४-२०१५). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहर स्वच्छ ठेवणाऱ्या सफाई कामगारांना कोणत्याही आरोग्य सेवा मिळत नसल्याने त्यांचे आरोग्य धोक्यात येऊन सफाई कामगारांचा मोठ्या प्रमाणात मृत्यू होत असल्याचा प्रकार दिवसेंदिवस वाढत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सफाई कामगारांची प्रत्येक महिन्याला आरोग्य तपासणी व निवासस्थाने देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०६-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) नाशिक महानगरपालिकेच्या सफाई कामगारांना महानगरपालिकेने, मागणीनुसार निवास व्यवस्था उपलब्ध करुन दिली आहे. सदर निवासस्थानांमध्ये राहणारे सफाई कर्मचारी व त्यांचे कुटूंबीय यांची महानगरपालिकेच्या फिरत्या दवाखान्यांमार्फत नियमितपणे वैद्यकीय तपासणी करण्यात येते. तसेच, सफाई कर्मचा-यांना वेतनामध्ये दरमहा रु. १,०००/- इतका वैद्यकीय भत्ता नाशिक महानगरपालिकेेकडून देण्यात येतो.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात आदिवासी जाती आणि जमातींच्या समस्या सोडविण्याबाबत

**(२७) ५५४८ (१०-०४-२०१५). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आदिवासी जाती आणि जमाती हजारोंच्या वर असून त्यांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी जाती आणि जमातींचा प्रश्न सोडविण्याकरिता त्यांच्यापर्यंत विज्ञान आणि तंत्रज्ञानासह उच्च शिक्षण पोहोचविण्याची नितांत आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग २ बाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१३-०७-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) आदिवासी विकास विभागामार्फत अनूसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शहरातील नामंकित निवासी इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये शिक्षण देणे, केंद्र पुरस्कृत पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती, परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना निर्वाहभत्ता देणे, व्यावसायिक वैद्यकीय व निमवैद्यकीय अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती करणे यासारख्या योजना आदिवासी विकास विभागामार्फत राबविण्यात येतात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई उपनगरातील मालाड पी /उत्तर विभागातील दुकाने व आस्थापनेत भोंगळ कारभाराबाबत**

**(२८) ५५८४ (०८-०४-२०१५). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील मालाड पी /उत्तर विभागातील दुकाने व आस्थापनेत भोंगळ कारभार सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी एन.ओ.सी.न घेता दुकानाची प्रमाणपत्रे दुसऱ्यांच्या नावे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती दोषी आढळून येणाऱ्या अधिकाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा येत आहे,
(४) अद्याप, उक्त प्रकरणी कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०६-२०१५) :**(१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषदेच्या वतीने घेण्यात आलेल्या शिक्षक पात्रता परिषदेत हातानी लिहिलेले पेपर देण्यात आल्याबाबत**

**(२९) ५५९३ (०९-०४-२०१५). श्री.नसीम खान (चांदिवली), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषदेच्या वतीने दिनांक १४ डिसेंबर, २०१४ रोजी घेण्यात आलेल्या शिक्षक पात्रता परिषदेत डीईटी उर्दु माध्यमाच्या विद्यार्थ्यांना हातानी लिहिलेले पेपर देण्यात आल्यामुळे प्रश्न वाचण्यातच वेळ गेल्याने निकालावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त प्रश्नपत्रिकेत २० हून अधिक चुका असल्याबाबत राज्य परिक्षा परिषदेकडे सुमारे ६०० तक्रारी परिक्षार्थींनी केल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणातील दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच विद्यार्थ्यांना योग्य न्याय मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-०७-२०१५) :**(१) नाही.
(२) व (३) उर्दू माध्यमाच्या प्रश्नपत्रिकेमध्ये दोन प्रश्न चुकलेले असुन परीक्षार्थीकडून प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने सदर प्रश्न रद्द करण्यात आले आहेत. उर्वरित प्रश्नांना प्रमाणशीर गुण देण्यात आले असून विद्यार्थ्यांचे कोणतेही नुकसान झालेले नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई विद्यापीठातील विविध पदावरील कंत्राटी व रोजंदारी तत्वावरील कर्मचाऱ्यांना कायम करण्याबाबत**

**(३०) ५५९८ (०९-०४-२०१५). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाने शिपाई, माळी, लिपिक व शिक्षकेत्तर अशा ९३८ कर्मचा-यांना गेल्या १५ वर्षापासून कंत्राटी व रोजंदारी तत्वावर ठेवण्यात आले हाेते, तथापि त्यांना कामावरुन कमी करण्यात आले असून या सर्व कर्मचा-यांना वेतनवाढ, पदोन्नती, भविष्य निर्वाह निधी, भरपगारी रजा असे कोणतेही लाभ दिले नसल्याचे तसेच सदरील कर्मचाऱ्यांना सहा महिने काम केल्यानंतर एक दिवसाची सुट्टी देऊन पुन्हा त्यांना सेवेत घेऊन कामगार कायद्याचे उल्लंघन केल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.कामगार न्यायालयाने रोजंदारी व कंत्राटी तत्वावरील कर्मचा-यांना कामावरुन काढण्यास स्थगिती देऊन त्यांना कायमस्वरुपी सेवेमध्ये घेण्याचे निर्देश दिले असतानाही सदरील कर्मचा-यांना अद्याप सेवेत सामावून घेण्यात आले नसल्याचे दिनांक १६ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून न घेण्याची कारणे काय आहेत,
(४) उक्त विद्यापीठातील सदरील कर्मचा-यांना त्वरीत सेवेत सामावून घेण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असल्यास, साधारणत: केंव्हापर्यंत त्यांना सेवेत कायम करणे अपेक्षित आहे ?

**श्री. विनोद तावडे (१६-०७-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२) अंशत: खरे आहे.
(३) व (४) सदर नियुक्त्या हया विहीत मार्गाने झालेल्या नसून त्या तात्पुरत्या स्वरुपातील असल्याने मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने त्यांना नियमित सामावून घेण्याची मागणी मान्य करता येणार नाही.

---

**हिंगोली जिल्हयात आदिवासी बहुल गांवे असतांनाही शासनाने ही गांवे आदिवासी क्षेत्राबाहेरची असल्याची कारणे दाखल करून आदिवासी उत्थान कार्यक्रमातून वगळली असल्याबाबत**

**(३१) ५६२५ (१०-०४-२०१५). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्हयात आदिवासी बहुल गांवे असतांनाही शासनाने ही गांवे आदिवासी क्षेत्राबाहेरची असल्याची कारणे दाखल करून आदिवासी उत्थान कार्यक्रमातून ती वगळली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, हिंगोली जिल्हयात कळमनुरी, औढा नागनाथ व हिंगोली तालुक्यात सर्वाधिक आदिवासी गांव असुन या गांवामध्ये विकास कामांसाठी पुरेसा निधी शासनाकडून मिळत नसल्यामुळे ही गांवे विकासापासून दूर आहेत तसेच आरक्षणामुळे काही गांवामध्ये आदिवासी सरपंच झाले असले तरी निधीच नसल्यामुळे गांवाचा विकास होऊ शकत नाही हे, खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासन काय कार्यवाही करणार वा करीत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१३-०७-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौ.कांडली (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) ग्राम पंचायतीच्या विवि ध कामात लाखो रुपयाचा झालेल्या गैरव्यवहारबाबत**

**(३२) ५६३५ (०६-०४-२०१५). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौ.कांडली (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) येथील एका गटाने ग्राम पंचयातीच्या विविध कामात लाखो रुपयाचा गैरव्यवहार केले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती दोषी आढळून येणा-या संबंधितांवर शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,
(४) अद्याप, याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याची त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (१०-०७-२०१५) :**(१) हे खरे नाही.
परंतु गावातील काही नागरीकांनी मा. नामदार बबनरावजी लोणीकर, मंत्री यांचेकडे दि.१४/०१/२०१५ रोजी तकार दिली होती. सदर तक्रारीचे अनुषंगाने शाखा अभियंता पाणीपुरवठा उपविभाग ता. कळमनुरी यांचे मार्फत चौकशी करण्यात आली असून चौकशी व पहाणी अहवालानुसार तक्रारदाराच्या तक्रारीत तथ्य नसून अंतर्गत विरोधासाठी तक्रार करण्यात आल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मोरवड (ता. कळमनुरी , जि.हिंगोली) येथील मुख्य रस्त्यावर सौर उर्जेच्या पथदिव्यांची उभारणीबाबत**

**(३३) ५६३६ (०६-०४-२०१५). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोरवड (ता. कळमनुरी, जि.हिंगोली) येथील मुख्य रस्त्यावर उभारण्यात आलेले सौर उर्जेच्या १४ पथदिव्यांची उभारणी सन २०१३-१४ साली पाच वर्षे टिकतील अशा बेताने करण्यात आली होती परंतू प्रत्यक्षात काही दिवसांच्या आतच हे पथदिवे बंद पडले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कारणास्तव ग्रामस्थांना अंधाराचा सामना करावा लागत असून संबंधित ग्रामपंचयात सदरहू बंद पथदिव्याबाबत योग्य ती कार्यवाही करीत नसल्याने गावक-यामध्ये नाराजीचा सुरु निघत आहे हे पाहता शासन त्वरीत आवश्यक ती उपाययोजना करणार वा करीता आहे काय,
(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०६-२०१५) :**(१) होय.
(२) १४ सौर पथदिव्यांपैकी ८ सौर पर्थादवे तांत्रिक बिघाडामुळे बंद पडले असून ६ पथदिवे चालू स्थितीत आहेत. बंद पडलेले ८ सौर पथदिवे सिध्दी विनायक सोलार सिस्टीम, नागपूर या कंपनीने दिनांक १३.०५.२०१५ रोजी दुरुस्त केलेले आहेत.
(३) निरंक

---

**हिंगोली जिल्ह्यात दारिद्‌यरेषेसंदर्भात सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाले नसल्याबाबत**

**(३४) ५६३९ (०९-०४-२०१५). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यात दारिद्‌यरेषेसंदर्भात सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाले असून सर्वेक्षण करताना काही त्रुट्‌या आढळून आल्या आहेत तसेच या त्रुटी दूर करुन प्रारुप यादी प्रसध्दि करण्यात येणार असल्याचे सन्मानिय ग्रामविकास मंत्री यांनी दिनांक १९ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास जाहीर केले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर यादीचे प्रारुप प्रसिध्द करण्याबाबत शासनाने काय कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०६-२०१५) :**(१) व (२) होय

सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षणामध्ये हिंगोली जिल्ह्यात NIC कडून प्राप्त झालेल्या १८ हजार additional V file मध्ये जात, धर्म व त्यांचा साकेतांक क्रमांक इत्यादीमध्ये त्रुटी आढळून आलेल्या होत्या. सदरील त्रुटींचे निराकरण करण्यात आलेले आहे.

दरम्यान दिनांक ५ जानेवारी, २०१५ रोजी हिंगोली जिल्ह्याची प्रारुप यादी प्रसिध्द करण्यात आलेली असून दावे व आक्षेप दाखल करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कळमनुरी ता.जि.हिंगोली येथे राज्य परिवहन महामंडळाकरिता विदर्भातून मानव विकासाच्या ६० जुन्या गाड्या पाठविण्यात आल्याबाबत**

**(३५) ५६४१ (०३-०४-२०१५). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमनुरी ता, जि.हिंगोली येथे राज्यपरिवहन महामंडळाकरीता विदर्भातून मानव विकासाच्या ६० जुन्या गाड्या पाठविण्यात आल्या असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाड्यात बसगाड्याची संख्या वाढली परंतू त्यांच्या त्या वांरवार बिघडत असल्याने नागरिकांना प्रवासयोग्य राहिल्या नाहीत हे पाहता शासन त्वरीत आवश्यक ती कार्यवाही करणार वा करत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०४-०७-२०१५) :**(१) हे खरे नाही.

कळमनुरी ता.जि.हिंगोली हा परभणी विभागात येतो. शासन आदेशानुसार परभणी जिल्ह्याकरिता मानव विकास योजने अंतर्गत मानवत, सेलू, पाथरी, जिंतूर, परभणी, पुर्णी, गंगाखेड, सोनपेठ, पालम, हिंगोली, सेनगांव व औढा नागनाथ या १२ तालुक्यांना प्रत्येकी ५ प्रमाणे ६० नविन बसेस देण्यात आल्या आहेत.

(२) मानव विकास योजनेच्या गाड्यांची संख्या वाढलेली नाही. आगारातील बसेसची यांत्रिकी देखभालीची कामे नियोजित वेळेवर (दैनिक, दशदिनीय व त्रैमासिक डॉकिंग) केली जातात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली बस स्थानकात महिला वाहन चालक व कर्मचा-यांच्या सोईसाठी बांधण्यात येत असलेल्या विश्रामगृहाची जागा निश्चित होत नसल्याबाबत**

**(३६) ५६४२ (०४-०४-२०१५). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली बस स्थानकात महिला वाहन चालक व कर्मचा-यांच्या सोईसाठी बांधण्यात येत असलेल्या विश्रामगृहाची जागा निश्चित होत नसल्याने मागील दोन महिन्यांपासून बांधकामास सुरूवात झाली नसल्याचे दिनांक ९ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बांधकामास जागा उपलब्ध करून देऊन बांधकामास सुरूवात करण्याबाबत शासनाने काय कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०७-०६-२०१५) :**(१) हे खरे आहे.

(२) हिंगोली आगार परिसरात सद्यस्थितीत महिला विश्रांतीगृहाचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. सदरचे काम तळ घराच्या पायापर्यंत पुर्ण झाले असून ज्योत्याच्यावर अर्ध्या भिंतीपर्यंतचे बांधकाम करण्यात आले असून सुमारे ५० टक्के काम पूर्ण झालेले आहे. ज्या जागेवर रेखांकन देवून खोदकाम व इमारतीच्या पायापुर्व पर्यंतचे काम करण्यात आले त्यावर काही आक्षेप नोंदविण्यात आले होते. मंजुर नकाशाप्रमाणे (९ X ६ मिटर) ची पर्यायी जागा आगारात उपलब्ध नसल्याने त्याच जागेवर बांधकाम सुरु करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कळमनुरी ता.जि.हिंगोली येथील बसस्थानक शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेले बसस्थानक डबघाईला आल्याबाबत**

**(३७) ५६४३ (०४-०४-२०१५). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), डॉ.विजयकुमार गावीत (नंदुरबार), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमनुरी ता.जि.हिंगोली येथील बसस्थानक शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असून दिल्ली-हैदराबाद महामार्गावर आहे अशा मोक्याच्या ठिकाणी राज्यपरिवहन बसडेपो असूनही सध्या हे बसस्थानक काही अधिकारी व काही तथाकथित राजकीय नेत्यांच्या हस्तक्षेपामुळे डबघाईला आला असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त परिवहन बसस्थानकातील काही बस इतरत्र पाठविण्यात आल्या तसेच चालक व वाहन यांच्या देखील काही कारण नसताना इतरत्र बदल्या करण्यात आल्या त्यामुळे सदरह परिवहन स्थानकांची कारभार पहाण्यासाठी आवश्यक त्या सोयी सुविधा नाहीत ते पाहता शासन त्वरीत आवश्यक ती कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१४-०७-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

कळमनुरी आगारात ३८ वाहने उपलब्ध असून त्यापैकी कोणतेही वाहन इतरत्र देण्यात आले नाही. तर एक नवीन रा.प. बस कळमनुरी आगारास देण्यात आली आहे. आगारातील ४ चालकांच्या विनंतीनुसार बदल्या केलया असून नव्याने ३ चालकांना नियुक्ती दिली आहे. आगारातील कोणत्याही वाहकांची इतरत्र बदली करण्यात आलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यातील भोटगाव शिवारातून जाणाऱ्या उर्ध्व पैनगंगा प्रकल्पाच्या उजव्या कालव्यात जमिनी गेलेल्या शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत मोबदला न मिळाल्याबाबत**

**(३८) ५६४४ (०७-०४-२०१५). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यातील भोटगाव शिवारातून जाणाऱ्या उर्ध्व पैनगंगा प्रकल्पाच्या उजव्या कालव्यात जमिनी गेलेल्या शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत मोबदला मिळाला नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मोबदला मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१७-०६-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, या बाबत जिल्हाधिकारी हिंगोली यांचे कडून उप विभागीय अधिकारी कळमनुरी यांना पत्रव्यवहार केलेला आहे. खाजगी वाटाघाटीबाबत भूसंपादक यंत्रणेकडे कळविलेले आहे. परंतू दि.०१.०१.२०१४ रोजी नवीन भूसंपादन कायदा लागू झाल्यामुळे प्रकरणात नवीन कायद्यान्वये भूसंपादन करणे आवश्यक आहे. सदर कायद्यात खाजगी वाटाघाटीचे अधिकार नाहीत. तथापी आता शासनाने खाजगी क्षेत्रातील जमीन सिंचन इतर प्रकल्पासाठी खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने घेणे बाबत दि.१२.५.२०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे.

(३) व (४) प्रकरणात नवीन भूसंपादन कायद्यान्वये भूसंपादनाची प्रक्रिया सुरु असून कलम ११(१) ची अधिसूचना राजपत्रात प्रसिध्द करणेसाठी व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद येथे पाठविण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. कार्यवाही पूर्ण होताच शेतकऱ्यांना मोबदला वाटप करण्यात येईल.

---

## कळमनूरी व आखाडा बाळापूर ( जि.हिंगोली)येथील पोलीस ठाणे अंतर्गत ८३ गावातील पोलिस पाटील पदे रिक्त असल्याबाबत

**(३९) ५६४९ (०६-०४-२०१५). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.आकाश फुंडकर (खामगांव), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषतः हिंगोली, सोलापूर, उस्मानाबाद, बुलढाणा, नाशिक, लातूर, गोंदिया इत्यादी जिल्हयातील पोलिस पाटलांची १३ हजार पदे गत अनेक वर्षापासून रिक्त असल्याचे सन २०१५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पोलीस पाटलांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०६-२०१५) :**(१) हिंगोली जिल्ह्यात २७९ पदे, सोलापूर जिल्ह्यात ९३५ पदे, उस्मानाबाद जिल्ह्यात ३१० पदे, बुलडाणा जिल्ह्यात ३०२ पदे, नाशिक जिल्ह्यात ८१६ पदे, लातूर जिल्ह्यात २२८ पदे आणि गोंदिया जिल्ह्यात १३४ एवढी पोलीस पाटलांची पदे रिक्त आहेत. राज्यात पोलीस पाटलांची एकूण १५,५५२ पदे रिक्त आहेत.

(२) शासनाने दुष्काळाच्या कारणास्तव दि.२५.२.२०१३ च्या पत्रान्वये राज्यातील पोलीस पाटील भरती प्रक्रियेस स्थगिती दिली होती. सदर स्थगिती दि. २७.८.२०१४ च्या पत्रान्वये उठविण्यात आली आहे. तथापि, लोकसभा, विधानसभा आणि स्थानिक निवडणूकाच्या आचारसंहिता, अरक्षण सुधारीत बिंदुनामावली तयार करणे या कारणांस्तव भरती प्रक्रिया राबविण्यास विलंब झाला होता. सद्यस्थितीत राज्यातील पोलीस पाटलांची रिक्त पदे भरण्याची कार्यावाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कळमनुरी ता.जि. हिंगाली येथील आखाडा बाळापूर येथे महात्मा गांधी रोजगार हमी योजनेची कामे सुरु करण्यात दुर्लक्ष होत असल्याबाबत**

**(४०) ५६५० (०७-०४-२०१५). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमनुरी ता.जि. हिंगाली येथील आखाडा बाळापूर येथे महात्मा गांधी रोजगार हमी योजनेची कामे सुरु करण्यात दुर्लक्ष होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागेल त्याला काम मग्रारोहयो योजनेचा उद्देश कागदावरच राहिला असुन कळमनुरी तालुक्यात १२५ ग्रामपंचायत, १५१ गांव, वाडी, तांडा भागात मजूरांची संख्या मोठ्या प्रमाणात असून उक्त योजने अंतर्गत विविध कामे सुरु झाल्यास मजूरांना याचा मोठा आधार मिळणार आहे परंतु संबंधित पंचायत समिती, ग्रामपंचायती व यंत्रणेकडून ही कामे सुरु करण्यात दुर्लक्ष होत असल्याप्रकरणी शासन चौकशी करुन आवश्यक ती कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०७-०७-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यातील जलसंधारण विभागांतर्गत कामे करण्यासाठी आदेश निर्गमित करुनही कंपनीने कामाला सुरुवात न केल्याबाबत**

**(४१) ५६६१ (०६-०४-२०१५). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमनूरी (जि. हिंगोली) तालुक्यातील जलसंधारण विभागांतर्गत कामे करण्यासाठी मे. कॉन्स्ट्रोटेक प्रा.लि. इंजिनियर्स ॲन्ड कॉन्ट्रॅक्टर्स, जळगाव यांना दिनांक २० मे, २०१४ नियुक्त करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदेश निर्गमित करण्यात येऊनही ९ महिन्याचा कालावधी उलटूनही एका कंपनीने कामाला सुरुवात केली नसल्याने स्थानिक लोकप्रतिनिधी दिनांक २७ नोव्हेंबर, २०१४ रोजी जलसंधारण विभाग, प्रधान सचिव यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने उक्त कामे तातडीने सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे अद्यापी कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१०-०७-२०१५) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) अधीक्षक अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ, औरंगाबाद यांचे स्तरावर चौकशी करण्यात आली आहे.
(४) चौकशीच्या अनुषंगाने सदर योजनांची कामे पूर्ण करण्याचा कालावधी २४ महिने असून निविदा मुदत दिनांक १९ मे, २०१६ रोजी संपुष्टात येत आहे. कामे सुरु करण्यासाठी निविदेतील तरतुदीनुसार कंत्राटदारावर कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**जलसंधारण विभागाच्या माध्यमातून करण्यात येणाऱ्या १ हजार ३५१ कोटी रुपयांच्या कामांना स्थगिती देण्यात आल्याबाबत**

**(४२) ५६८० (०६-०४-२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जलसंधारण विभागाच्या माध्यमातून करण्यात येणाऱ्या १ हजार ३५१ कोटी रुपयांच्या कामांना स्थगिती देण्यात आल्याचे माहे जानेवारी २०१५ वा दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, १ हजार ३५१ कोटी रुपयांच्या या कामांमध्ये मुख्यत्वे सिमेंट नाला बंधारे, कोल्हापूरी पध्दतीचे बंधारे, साठवण बंधारे, पाझर तलाव बांधणे आदी लोककल्याणार्थ कामे मुख्यत्वे विदर्भ, मराठवाडा आणि कोकणातील आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास लोककल्याणर्थ कामांची स्थगिती उठवून सदरील कामे लवकरात लवकर पुर्ण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप प्रश्न भाग-३ बाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०६-२०१५) :**(१) व (२) व (३) अंशतः खरे आहे.
जलसंधारण विभागाच्या माध्यमातून करण्यात येणा-या विविध कामांना स्थगिती देण्यात आली आहे. तथापि, यामध्ये मुख्यत्वे उर्वरित महाराष्ट्र व मराठवाडा येथील कामे असून त्यामध्ये

विदर्भातील योजनांचा समावेश नाही. महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाच्या दिनांक १४ जानेवारी, २०१५ रोजी संपन्न झालेल्या ४८ व्या बैठकीतील विषय क्र. ५ अन्वये मंजूर करण्यात आलेल्या ठरावानुसार उर्वरित महाराष्ट्र व औरंगाबाद प्रदेशातील स्थगिती देण्यात आलेल्या सर्व योजनांची तांत्रिक व्यवहार्यता तपासून योजना तांत्रिकदृष्टया योग्य / अयोग्य असल्याबाबत, महामंडळांतर्गत पुणे व नागपूर येथे कार्यरत दोन मुख्य अभियंते तसेच जलसंपदा विभागाचा एक मुख्य अभियंता यांची समिती गठित करण्यात आली असून त्यांचेकडील अहवाल प्राप्त झाल्यानंतर याबाबत पुढील निर्णय घेण्याबाबतचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## आदिवासी विभागातील रखडलेली विकासकामे पूर्ण करण्यासाठी अर्थसंकल्पात निधीची तरतूद करण्याबाबत

**(४३) ५६८३ (०९-०४-२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील आदिवासी विभागातील विविध विकास कामासाठी निधीची कपात करण्यात आल्यामुळे कोट्यावधी रुपयांची विकास कामे रखडली असल्यामुळे आदिवासीमध्ये असंतोष पसरला असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास उघडकीस आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आिदवासी विभागातील रखडलेली आदिवासी विकास कामांना अर्थसंकल्पातील तरतूदतीत कपात करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी विभागातील रखडलेली विकासकामे पूर्ण करण्यासाठी सन २०१५ च्या अर्थसंकल्पात निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०६-०६-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उदभवत नाही.

---

**कामगार कायद्यात सुधारणा करण्याबाबत**

**(४४) ५७०२ (०६-०४-२०१५). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.रमेश कदम (मोहोळ), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने कामगार कायद्यात सुधारणा करण्याचे ठरविले असून या सुधारणेनुसार एखाद्या उद्योजकाला शासनाची परवानगी न घेता ३०० कामगारांना काढता येईल किंवा त्याला कंपनी बंद करण्याचा अधिकारी देण्यात येईल असे दिनांक २५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कामगार विरोधी कायद्यात बदल न करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (१५-०६-२०१५) :**(१) सध्यस्थितीत सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. तथापि आतापर्यंत कुठलाही निर्णय झालेला नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्ह्यातील भिवंडी ग्रामीण भागात अंगणवाडी पोषण आहार योजना व शाळांमधील माध्यान्ह भोजन योजनेबाबत**

**(४५) ५७२१ (०६-०४-२०१५). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील भिवंडी ग्रामीण भागात अंगणवाडी पोषण आहार योजना व शाळांमधील माध्यान्ह भोजन योजना यशस्वी झाली नसल्याने वर्षअखेरीस ग्रामीण भागात ८६९ कुपोषित बालके आढळली असून यापैकी १४७ बालकांची स्थिती गंभीर असल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ मध्ये आढळून आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कुपोषणाच्या या समस्याकडे ग्रामीण आरोग्य यंत्रणा व संबंधित प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, भिवंडी ग्रामीण भागातील कुपोषणाचा प्रश्न सोडविण्यासाठी कोणती विशेष मोहिम राबविण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

वि.स. ३६ (33)

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही.

तथापि मासिक प्रगती अहवालानुसार भिवंडी-१ व भिवंडी-२ या ग्रामीण प्रकल्पातील माहे डिसेंबर, २०१३ व डिसेंबर, २०१४ मधील कुपोषणाची तुलनात्मक स्थिती पुढीलप्रमाणे आहे.

| प्रकल्प | माहे / वर्ष | एकूण वजन घेतलेल्या बालकांची संख्या | सर्वसाधारण बालके | मध्यम कमी वजनाची बालके | तीव्र कमी वजनाची बालके |
|---|---|---|---|---|---|
| भिवंडी-१ | डिसेंबर, २०१३ | २५७१७ | २४८९९ | ७३१ | ८७ (०३३) |
| | डिसेंबर, २०१४ | २५१०७ | २४५८८ | ४६२ | ५७ (०.२२) |
| भिवंडी-२ | डिसेंबर, २०१३ | १६८६३ | १५२८५ | १२८२ | २८६ (१.६९) |
| | डिसेंबर, २०१४ | १७००३ | १४७८० | १७२६ | ४९७ (२.९२) |

(२), (३) व (४) हे खरे नाही. तथापि कुपोषण व बालमृत्यू रोखण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेतः

१. रोखण्यासाठी बाळंतपणामधील अंत वाढविणे. दोन अपत्यापर्यंत पाळणा थांबविणे या गुणात्मक दर्शकांच्या पूर्ततेवर भर दिला जातो.

२. गरोदर मातेची १६ आठवडयाच्या आत नोंदणी करुन धनुर्वात प्रतिबंधक लस, सल्फेटच्या १०० गोळया तीन महिन्यांसाठी दिल्या जातात.

३. जोखमींच्या मातांसाठी विशेष सेवा म्हणून हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी असलेल्या मातांना फेरस सल्फेटच्या गोळया उपचारात्मक मात्रा दिल्या जातात व अशा मातांना प्रसूती पूर्व, प्रसुती अंतर्गत व प्रसुती पश्चात ४२ दिवसांपर्यंत गुंतागुत उदभवू नये म्हणाून मानव विकास कार्यक्रमांतर्गत त्यांची स्त्रीरोगतज्ञांकडून तपासणी व औषध उपचार करण्यात येे.

४. जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमाअंतर्गत गरोदर मातांना प्रसुतीसाठी धरुन दवाखान्यात आणले जाते. सुरक्षित प्रसुतीनंतर घरी सोडले जाते व सदर कालावधीत त्यांना आहार देखील दिला जातो.

५. प्रसुतीनंतर बाळाचे वजन घेऊन नवजात बालकांची विशेष काळजी घेतली जाते.

६. सॅम व मॅम मधील बालकांची दरमहा वैद्यकीय तपासणी केली जाते से ० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना वर्षातून दोन वेळा अ जीवनसत्व व जंतनाशक औषधी दिली जातत.

७. अंगणवाडीतील सर्व बालकांचे वेळापत्रकानुसार लसीकरण करण्यात येते.

८. कुपोषण कमी करण्याच्या दृष्टीने ग्राम बाल विकास केंद्र व बाल उपाचार केंद्र घेण्यात येतात.

९.दुर्गम भागामध्ये आरोग्य सेवा पुरविण्यासाठी शिबीरे आयोजित करण्यात येत असून या शिबीरामध्ये जोखमीच्या गरोदर मातांची स्त्रीरोगतज्ञांमार्फत तपासणी करुन आवश्यकते नुसार संदर्भ सेवा देण्यात येते. सर्व गरोदर स्त्रिया, स्तनदा माता तसेच ० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांची तज्ञामार्फत करुन औषधोपचार करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील परळ येथील हाफकीन जीव औषध निर्माण महामंडळात रोजंदारीवर असलेल्या कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी नोकरीत सामावून घेण्याबाबत**

**(४६) ५७२६ (०६-०४-२०१५). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.संजय सावकारे (भुसावळ), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील परळ येथील हाफकीन जीव औषध निर्माण महामंडळात सन १९९५ मध्ये वा त्यासुमारास रोजंदारीवर असलेल्या ४२ कामगारांना कामावर ठेवण्याचे न्यायालयीन आदेश असताना कंपनी व्यवस्थापन दखल घेत नसल्याने नोकरीअभावी त्या कर्मचाऱ्यांची व त्यांच्या कुटूंबाची वणवण होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच सन २०११ मध्ये वा त्यासुमारास कामगारांना सेवाज्येष्ठतेनुसार कामावर घेण्याचे आदेश न्यायालयाने दिले असता १३४ रोजंदारी कर्मचाऱ्यांना कायम करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने उक्त ४२ रोजंदारी कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी नोकरीत सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्यामागील सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१६-०६-२०१५) :**(१) नाही. रोजंदारीवर असलेल्या ४२ कामगारांना न्यायालयाने कामावर ठेवण्याबाबत कुठलेही आदेश दिलेले नव्हते. केवळ भविष्यात रोजंदारी तत्वावरील काम उपलब्ध झाल्यास प्राधान्याने चक्राकार पध्दतीने त्यांच्या वरिष्ठता यादीप्रमाणे रोजंदारीवरील काम देण्यात यावे असे कळविले सदरचा निकाल दिनांक २४.०८.२०११ रोजी युएलपी क्र.७६९/२००० रोजी देण्यात आला. परिणामी व्यवस्थापनाने न्यायालयीन आदेशाची दखल न घेण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(२) होय, परंतु २०११ च्या निकालानुसार १३४ कर्मचा-यांना कामावर कायम करण्यात आलेले नाही तर दिनांक १६.११.१९९९ च्या त्रिपक्षीय करारानुसार १३३ रोजंदारी कामगारांना नोव्हेंबर १९९९ ते जानेवारी २००३ या काळात आवश्यकतेनुसार टप्प्याटप्प्याने कायम केले.

(३) नाही. याबाबत चौकशी करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याकारणाने व मा.औद्योगिक न्यायालयाने रोजंदारी कामगारांच्या बाजूने नोकरीत सामावुन घेण्याबाबत कोणतेही आदेश दिलेले नसल्याने कार्यवाहीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) या संदर्भातील युएलपी क्र.३७४/२०१२ ही तक्रार अंतरिम निकालाद्वारे न्यायालयाने फेटाळली असून न्यायप्रविष्ट आहे. तसेच युएलपी क्र.५९/२०१२ ही तक्रार मा.कामगार न्यायालयात प्रलंबित आहे. प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

---

**राज्यातील शहरी शाळांमधील विद्यार्थ्यांचे मराठी आणि गणित विषयांमधील ज्ञान ग्रामीण विद्यार्थ्यांपेक्षा कमी असल्याबाबत**

**(४७) ५७७९ (०९-०४-२०१५). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.संजय पोतनीस (कलिना), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शहरी शाळांमधील विद्यार्थ्यांचे मराठी आणि गणित विषयांमधील ज्ञान ग्रामीण विद्यार्थ्यांपेक्षा कमी असल्याचे माहिती राज्य शासनाच्या शिक्षण विभागाने केलेल्या सर्वेक्षणांतून दिनांक २ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आले,हे खरे आहे काय,

(२) तसेच प्रथम फाऊंडेशनने देशभर केलेल्या असर या पाहणीत शैक्षणिक गुणवत्तेवर अभ्यास गट नियुक्त करण्याचा व त्यानुषंगाने उपाययोजना करण्याचा निर्णय घेतला असून सदरील पहाणीत महाराष्ट्रातील शैक्षणिक गुणवत्तेचा उतरता क्रम दिसत असून ग्रामीण भागांतील मुलांमध्ये वाचन व अध्ययन क्षमता फारच कमी असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या दुस-या आठवड्यात निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहरी शाळांची गुणवत्ता तपासण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच राज्यातील शिक्षण पध्दतीत सुधारणा आणण्यासह विद्यार्थ्यांची गुणवत्ता उंचावण्यासंदर्भात शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-०७-२०१५) :**(१) होय.

(२) हो हे खरे आहे.

(३) सन २०१५-१६ पासून एकात्मिक शैक्षणिक गुणवत्ता विकास कार्यक्रमांतर्गत राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या सर्व माध्यमाच्या मान्यताप्राप्त शाळांमधून इयत्ता १ ली ते ८ वी तील सर्व विद्यार्थ्यांसाठी प्रथम भाषा व गणित या विषयाच्या संपादणूक चाचण्यांचे आयोजन करणे निश्चित केले आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**सिल्लोड तालुका अवर्षणग्रस्त क्षेत्र घोषित करण्याबाबत**

**(४८) ५७९८ (०४-०४-२०१५). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिल्लोड (जि.औरंगाबाद) या तालुक्यात दरवर्षी पाऊस अतिशय कमी होत असल्याने हा संपूर्ण तालुका अतिशय दुष्काळी असल्यामुळे हा तालुका अवर्षणग्रस्त क्षेत्र घोषित करण्याबाबत मा.लोकप्रतिनिधी तसेच नागरिकांनी संबंधितांकडे वारंवार मागणी करण्यात येऊनही अद्यापी याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याने माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिल्लोड तालुका अवर्षणग्रस्त क्षेत्र घोषित करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१५-०६-२०१५) :**(१) नाही.
(२) सन २०१४-१५ मध्ये तालुके अवर्षणग्रस्त जाहीर न करता ज्या गांवाची खरीप व रब्बी हंगामातील पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी असलेल्या गावांमध्ये टंचाईपेक्षा कमी पैसेवारी असलेल्या गावांमध्ये टंचाईसदश्य परिस्थिती जाहीर करुन तेथे विविध सोयी-सवलती लागू केल्या आहेत. तदुनसार सन २०१४-१५ च्या खरीप हंगामातील पैसेवारी जाहीर केलेल्या औरंगाबाद जिल्ह्यातील सर्व १३५३ गावांचा समावेश करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण-डोबिंवली परिवहनमध्ये महिन्याअखेरीस व्होल्वो बसेस ठेवण्याकरीता जागाबाबत**

**(४९) ५८०८ (०६-०४-२०१५). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोबिंवली परिवहनमध्ये महिन्याअखेरीस व्होल्वो बसेस ठेवण्यासाठी परिवहनकडे जागा नसून परिवहन आगारासाठी आरक्षित खंबळपाडा येथील जागेवर महानगरपालिका प्रशासनाने कचऱ्याच्या गाडया ठेवून अतिक्रमण केल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत परिवहन विभागाने कोणती कार्यवाही करण्यात येत आहे वा करीत आहे,
(३) असल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०७-२०१५)** :(१) कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या विकास आराखड्यामध्ये परिवहन उपक्रमाकरीता आरक्षण क्र. १३ व ५०७ या आरक्षित भूखंडाचा खंबाळपाडा आगारात समावेश आहे. हा भूखंड सन २००५ मध्ये महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमांकरीता हस्तांतरीत झाला आहे. परिवहन उपक्रमाकडून डिसेंबर, २०१० अखेरपर्यंत या आगारातून भाडे तत्वावरील बसेसचे संचलन करण्यात आले. भाडे तत्वावरील बस योजना डिसेंबर, २०१० मध्ये बंद झाल्यानंतर या आगारात महानगरपालिकेच्या सन कचरा व्यवस्थापनाच्या कचरा गाड्या पार्क करण्यात येत आहेत.
(२) कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमाच्या ताफयात जलवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुस्थाने योजनेअंतर्गत दाखल होत असलेल्या बस गाड्यांच्या पार्श्वभुमीवर बस पार्किग व संचलनाकरीता खंबाळपाडा आगार येथे पार्क केलेल्या कचऱ्याच्या गाड्या हलविण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेकडून आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खान्देशात दरवर्षी रब्बी हंगामात शेतकरी गहू व हरबरा वगैरेची मोठ्या प्रमाणात लागवड करता दरवर्षी शेतक-यांना युरिया खत खूप कमी प्रमाणात दिले जात असल्याबाबत**

**(५०) ५८१६ (०८-०४-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.के. पाडवी (अक्कलकुवा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खान्देशात दरवर्षी रब्बी हंगामात शेतकरी गहू व हरबरा वगैरेची मोठ्या प्रमाणात लागवड करता दरवर्षी लागवड क्षेत्र व खतांची मागणी यांचा दांडगा अनुभव असूनही दरवर्षी शेतक-यांना युरिया खत खूप कमी प्रमाणात दिले जाते शिवाय वाहतुकीचा खर्च ही त्यांच्याकडून वेगळा वसूल केला जातो असे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या दरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतक-यांना पुरेसे युरिया खत उपलब्ध करुन देण्याचा दृष्टीने शासन काही धोरणात्मक निर्णय घेणार आहे काय,
(३) असल्यास, त्याचा तपशील काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०८-०४-२०१५) :**(१) रब्बी हंगाम २०१४-१५ मध्ये नाशिक विभागातील धुळे व नाशिक जिल्ह्यांमध्ये अत्यल्प प्रमाणात युरिया खताची टंचाई भासली होती. परंतु संयुक्त व मिश्र खतांच्या विविध ग्रेडच्या माध्यमातुन क्षेत्रीय कर्मचाऱ्यामार्फत प्रचार व प्रसिध्दी करुन नत्रांची गरज भागविण्यात आली. नंदुरबार व जळगाव जिल्ह्यात युरीया खताची टंचाई दिसुन आली नाही. तसेच खताच्या वाहतुकीचा खर्च शेतकऱ्यांकडून वेगळ्याने वसुल केल्यासंदर्भात कोणतीही तक्रार आढळुन आलेली नाही.
(२) व (३) शेतकऱ्यांना त्यांच्या मागणीप्रमाणे व पुरेसे खत उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने राज्य शासन नेहमी प्रयत्नशील असते. त्यानुषंगाने मा.पालकमंत्र्याच्या तसेच मा.मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली प्रतिवर्षी खरीप हंगाम पूर्व आढावा बैठका घेऊन कृषि निविष्ठांच्या पुरवठ्याचे सुक्ष्म नियोजन केले जाते. आवश्यकतेनुसार कृषि आयुक्त स्तरावर तसेच शासन स्तरावर सुध्दा वरचेवर आढावा बैठका घेतल्या जातात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.